# श्रीपाद सेवा मंडळ : केंद्रवृत्तांत

सौ.प्रतिभा जवदंड

श्री.महेश राय

---

**भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराज जयंती-महोत्सव; श्रीक्षेत्र जळगांव (जामोद) :**

प्रतिवर्षी भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांच्या जयंती महोत्सवाचा मुख्य सोहळा, **'श्रीपाद सेवा मंडळा'**च्या श्रीक्षेत्र जळगांव (जामोद) या केंद्रस्थानी, प.पू.सद्‌गुरु श्री.दादांच्या परममंगल उपस्थितीत संपन्न होत असतो. या वर्षी हा उत्सव, भाद्रपद शु.४ दिनांक २ व ३ सप्टेंबर २००८ रोजी, जळगांव (जामोद) येथे मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. मंदिराच्या पायऱ्यांपासून सुंदर, नयनमनोहर रांगोळ्या दुतर्फा काढण्यात आल्या होत्या. मंदिराला चहूबाजूंनी फुलांच्या माळा लावून सजविण्यात आले होते. महोत्सवाकरिता सोमवार दिनांक १ सप्टेंबरच्या संध्याकाळपासूनच अनेक साधकांचे प्रकल्पस्थानी आगमन होण्यास सुरुवात झाली.

मंगळवार दिनांक २ सप्टेंबर रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या वेळात, सामुदायिक साधनेने कार्यक्रमास सुरुवात झाली. ९.०० ते ९.३० या वेळात अल्पोपाहार घेऊन, सर्व साधक **'श्रीस्वामी समर्थ नामपाठ'** म्हणण्यासाठी सभागृहात स्थानापन्न झाले. १०.०० ते ११.०० या वेळात, 'श्रीस्वामी समर्थ नामपाठा'ची गायनसेवा सर्वांनी राजाधिराज श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या चरणी रुजू केली. आता सर्वांना ओढ लागली ती प.पू.सद्‌गुरु श्री.दादांच्या आगमनाची. सर्वांच्या नजरा मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी खिळून राहिल्या होत्या.

उत्सवासाठी तीन दिवस प.पू.सद्‌गुरु श्री.दादांची उपस्थिती ही उपस्थित साधकांसाठी सर्वसुखाची पर्वणीच होती. ठीक साडेअकरा वाजता, प.पू.श्री.दादांचे प्रकल्पस्थानी शुभागमन झाले. अत्यंत गोड, सुमधुर स्मितहास्य प्रसन्न मुखावर विलसत असताना प.पू.श्री.दादांचे मंदिरात आगमन झाले. सुवासिनींनी त्यांना औक्षण केले. त्यानंतर देवांची आरती होऊन सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. दुपारी २.०० वाजता, सर्वांच्या आश्चर्याला व आनंदाला भरते येईल असा प.पू.श्री.दादांचा सर्वांना साधनागृहात एकत्र येण्याचा निरोप आला. प्रारंभी सर्वांनी रांगेत उभे राहून प.पू.सद्‌गुरु श्री.दादांचे दर्शन घेतले. भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांच्या आणि प.पू.सद्‌गुरु श्री.दादांच्या पावन मनोहर दर्शनामुळे प्रत्येकाला अवर्णनीय आनंद झाला होता.

प.पू.सद्‌गुरु श्री.दादांचा आदल्या दिवशी पूर्ण दिवस प्रवास झाला असल्याने, खरे तर आम्ही स्वयंसेवकांनी सर्वांनाच दर्शन घेऊन बाहेर निघावयास सांगितले. परंतु प.पू.सद्‌गुरु श्री.दादांनीच सर्वांना बसावयास सांगितले व तेथेच शंका-समाधानाचा कार्यक्रम सुरू झाला. सर्व प्रश्नांना प.पू.श्री.दादांनी अत्यंत समर्पक अशी उत्तरे दिली. कार्यक्रम-पत्रिकेत आयोजित नसूनही, आयत्या वेळेवर झालेल्या या उद्बोधक शंका-समाधानाने सर्व साधकगण अंतर्बाह्य तृप्त झाले.

दुपारी ३.०० ते ४.०० या वेळात, स्थानिक महिला भजनी मंडळाने आपली भजनगायनाची सेवा श्रीसद्‌गुरुचरणी रुजू केली. त्यानंतर ४.३० ते ६.३० या वेळात, ह.भ.प.श्री.श्याममुरारी उपासनी (निजामपूरकर) महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. त्यांना संवादिनीवर श्री.पुराणिक, तर पखवाजावर श्री.मनोज भांडवलकर यांनी साथ केली. संध्याकाळी ७.०० ते ८.०० या वेळात आरती होऊन, सर्वांनी तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर अल्पोपाहाराने उत्सवाच्या पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

दुसऱ्या दिवशी, बुधवार दिनांक ३ सप्टेंबर रोजी पहाटे ४.०० वाजता, ह.भ.प.श्री.श्याममुरारी उपासनी (निजामपूरकर) महाराजांनी जन्मकाळाच्या कीर्तनसेवेस प्रारंभ केला. सूर्योदयसमयी, **'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'** या महामंत्राचा जप करण्यात आला व सर्व वाद्यांच्या घोषात भगवान

श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांचा जयजयकार करून, जन्मकाल साजरा करण्यात आला. भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांची प्रतिमा, रंगीबेरंगी फुलांनी सुशोभित केलेल्या पाळण्यात ठेवण्यात आली. सौ.अनिता बोरगांवकर यांनी सुरेल आवाजात पाळणा म्हटला. दोन दिवस श्रीभगवंतांसमोर कीर्तनसेवा रुजू केल्याबद्दल, ह.भ.प.श्री.श्याममुरारी उपासनी महाराजांचा प.पू.सद्गुरु श्री.दादांच्या हस्ते शाल व श्रीफळ प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना साथ करणारे श्री.पुराणिक व श्री.मनोज भांडवलकर यांचाही प.पू.श्री.दादांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर सकाळी ८.०० ते ९.०० या वेळात सामुदायिक साधना झाली. त्याचवेळी गर्भगृहात देवांच्या पादुकांची पवमान-अभिषेकपूर्वक पूजा करण्यात आली.

करुणाब्रह्म सद्गुरु साधकांच्या मनातले भाव कसे अचूक जाणतात, याचाच एक अनोखा अनुभव आम्ही जळगांवच्या साधकांनी या उत्सवात घेतला. या श्रावण महिन्यात जळगांव येथील साधकांनी दर शनिवारी, तसेच उत्सवांच्यावेळी 'श्रीहरिपाठ' म्हणावयास सुरुवात केली होती. परंतु प.पू.सद्गुरु श्री.दादांना जी चाल अपेक्षित आहे, त्यात मात्र आम्ही कमी पडत आहोत, याची आम्हांला सतत खंत वाटत होती. प.पू.श्री.दादांनी आमच्या मनातील हे भाव अचूक ताडले असावेत. सकाळी ९.३० ते १०.३० या वेळात, प.पू.श्री.दादांनी 'श्रीहरिपाठ' म्हणावयास सांगितला. उत्सवप्रसंगी प्रथमच जळगांव (जामोद) येथे असे टाळकरी उभे राहून 'श्रीहरिपाठ' होत होता. पुण्याच्या साधकांसमवेत मग सर्वांनी श्रीहरिपाठसेवा सद्गुरुचरणी रुजू केली.

हरिपाठ झाल्यावर सर्वजण आतुर झाले होते ते प.पू.सद्गुरु श्री.दादांच्या आशयघन, रसाळ प्रवचनासाठी. सकाळी ११.०० वाजता, प.पू.श्री.दादांनी प्रवचनसेवेला सुरुवात केली. सेवेसाठी प.पू.श्री.दादांनी श्रीसंत तुकाराम महाराजांचा खालील अभंग घेतला होता;

**गरुडाचे पायीं । वेळोवेळा ठेवीन डोई ॥ १ ॥**

**वेगे आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरीं ॥ २ ॥**

**पाय लक्ष्मीच्या हातीं । तिसी यावे काकुळती ॥ ३ ॥**

**तुका म्हणे शेषा । जागे करा हृषीकेशा ॥ तु.गा.६६९.४ ॥**

प.पू.सद्गुरु श्री.दादांनी प्रवचनात सांगितले की, ''जसे आपल्याला एखाद्या व्यक्तीशी काम असल्यास किंवा ती व्यक्ती भेटत नसल्यास, आपण त्याच्या अवतीभोवती राहणाऱ्यांना किंवा त्याच्या पी.ए.ला पकडतो; तसेच श्रीसंत तुकाराम महाराजांनी येथे जे नित्य श्रीभगवंतांसोबत असतात अशा गरुडांना, लक्ष्मीदेवींना व शेषांना श्रीभगवंतांची भेट घडवून आणण्यासाठी प्रार्थना केली आहे. गरुड हा 'महाप्राण' आहे. आनंदमयता हा परब्रह्माचा स्वभाव आहे. 'हरि' म्हणजे हरण करणारे. आपल्या वृत्ती जर 'हरिमय' झाल्या, तर आपल्याला परमानंद प्राप्त होईल. 'शेष' म्हणजे श्रीभगवंतांची कृपाशक्ती होय !'' आपल्या प्रवचनातून, साधना नियमितपणे व प्रेमाने करण्याविषयीही प.पू.श्री.दादांनी सर्वांना कळकळीचे आवाहन केले. सद्गुरु लाभले तर ते जीवाला कर्मांच्या कर्जातून क्षणात मुक्त करतात, हेही त्यांनी एका उद्बोधक कथेतून सांगितले. प.पू.श्री.दादांच्या या बहारदार प्रवचनसेवेत एक तास कसा निघून गेला ते कोणालाच कळले नाही. त्यानंतर आरती संपन्न झाली व सर्वांनी रांगेतून सद्गुरुदर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

दुपारी ३.०० वाजता, साधकभक्तांनी रंगीबेरंगी फुलांच्या माळांनी पालखी सजवून सुशोभित केली. सूर्य-चंद्रादी चिन्हांकित छत्रचामरे, चवऱ्या तसेच टाळ, मृदंग, संवादिनी इत्यादी वाद्यांसह पालखी प्रदक्षिणेसाठी सज्ज झाली. प.पू.सद्गुरु श्री.दादांनी भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांची प्रतिमा व श्रीचरणपादुका पालखीत स्थानापन्न करून त्यांचे पूजन केले. पहिल्या प्रदक्षिणेतील पहिल्या द्वारावर **'धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची'** या अभंगाने प्रदक्षिणाक्रमास प्रारंभ झाला. गळ्यात टाळ घेऊन पालखीसोबत असणारे साधकभक्त आनंदविभोर होऊन नाचत होते. तिसऱ्या द्वारावर पालखी आली आणि **'भीमा अमरजा संगमतीरी ।'** हा अभंग चालू

असतानाच आकाशात काळेभोर मेघ दाटून आले व काही क्षणातच जोरदार पावसास सुरुवात झाली. सर्व साधकभक्तजन पावसात (खरे तर प.पू.सद्‌गुरु श्री.मामांच्या कृपावर्षावात) चिंब भिजत होते. प.पू.सद्‌गुरु श्री.दादाही त्यावेळी अतीव गोड हसत होते. जणू काही प्रत्यक्ष श्रीस्वामी महाराजच पालखीत विराजमान झाले होते; त्यामुळेच की काय प.पू.श्री.दादा पालखी व्यवस्थित पकडण्यासाठी सेवकांना वेळोवेळी सूचना देत होते. सर्वांच्या हृदयांत पालखी सोहळ्याच्या वेळी आनंदाचे कल्लोळ उसळत होते. त्यानंतर झालेल्या **'गुरु हा संतकुळींचा राजा ।'** या अभंगाच्या वेळी तर, प.पू.सद्‌गुरु श्री.दादांचे सद्‌गुरुप्रेम बघून सर्व साधकगण अंतर्मुख झाले होते.

**'आनंदाचे डोही आनंदतरंग'** उसळवणाऱ्या, साधारणतः दोन तास चाललेल्या या अप्रतिम अशा पालखीसोहळ्यानंतर आरती करण्यात आली. त्यानंतर तीर्थप्रसाद घेऊन सर्वांनी पुन्हा एकदा रांगेत प.पू.श्री.दादांच्या दर्शनाचा लाभ घेतला. त्यानंतर अल्पोपाहार घेऊन बाहेरगांवांहून आलेल्या बऱ्याचशा साधकांनी सर्वांचा प्रेमाचा निरोप घेतला.

अशाप्रकारे अतिशय आनंदमय, मंगलमय असणारा, दोन दिवस चाललेला हा भगवान श्री श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी महाराजांच्या जन्मोत्सवाचा परमदिव्य सोहळा, सद्‌गुरुकृपेची अखंड प्रचिती देत, प्रसन्न वातावरणात सुसंपन्न झाला.

□□